Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२२ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.३० जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# भाजप सत्तेत असताना ओबीसीवर अन्याय होवू देणार नाही

## हा सरसकट घेतलेला निर्णय नाही-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर**-सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणाचा अध्यादेश काढल्याने ओबीसी आक्रमक झालेले पाहायला मिळत आहेत. या निर्णयाविरोधात ओबीसी संघटना आणि नेते आक्रमक भूमिका घेत आहेत. यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

आमचं सरकार कुठल्याही परिस्थितीत ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही. जोपर्यंत भाजप सत्तेत आहे, तोपर्यंत आम्ही ओबीसी समाजावर कुठलाही अन्याय होऊ देणार नाही. असं काही झालं तर मी स्वतः वरिष्ठांशी बोलणार असल्याचे फडवणीसांनी सांगितलं.मराठा समाजाच्या आरक्षणा संदर्भात घेतलेला निर्णय हा केवळ नोंदी असलेल्यांसाठीच आहे. ज्यांच्याकडे कुणबी नोंदी आहेत. त्याच व्यक्तींना या आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. त्यासोबत त्यांच्या रक्तातील नातेवाईकांना याचा फायदा घेता येणार आहे. मात्र, हे आरक्षण सरसकट घेतलेला निर्णय नाही.मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजातील लोकांनी माध्यमांवर दाखवल्या जात असलेल्या आकडेवारी विश्वास ठेवू नये. या आकडेवारीवर बोलणं चुकीचं आहे. मराठा आरक्षणाबाबत कायदेशीर कामकाज सुरू आहे. राज्य मागास आयोग त्यासाठी काम करत असल्याचेही फडणवीस म्हणालेत.भुजबळांनी ओबीसीवर अन्याय झाल्याचा आरोप केला आहे, यासंदर्भात त्यांच्याशी स्वतः चर्चा करणार असल्याचेही फडणवीसांनी सांगितलं. भुजबळांनी त्यांचे आक्षेप मांडावे, त्यावर योग्य ती चर्चा करून योग्य तो तोडगा काढण्यात येणार असल्याचे आश्वासन फडणवीसांनी केले.भुजबळ म्हणाले की, माझ्या भूमिकेशी तटस्थ राहणार आहे. जर माझी भूमिका पटत नसेल तर पक्षाने माझ्यावर कारवाई करावी. पण मी कायमस्वरूपी ओबीसी समाजासाठीच लढत होतो आणि लढत राहणार असल्याचे ते म्हणालेत.



## वरोरा येथे भव्य शेतकरी मेळावा

**वरोरा | प्रतिनिधी**

अंबुजा सिमेंट फाउंडेशन उत्तम कापूस प्रकल्प व कंचनी फार्मर प्रोड्युसर कंपनी यांचा संयुक्त विद्यमाने बालाजी सभागृह वरोरा येथे २० जानेवारी २०२४ ला भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला व या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद शेतकऱ्यांकडून लाभला.

यावेळी कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुणे प्रमुख उपस्तिथी श्रीकांत कुंभारे झोनल हेड अंबुजा सिमेंट फाउंडेशन, प्रमोद मेश्राम प्रकल्प समन्वयक अंबुजा सिमेंट फाउंडेशन, सुभाष बोबडे सहायक प्रकल्प समन्वयक अंबुजा सिमेंट फाउंडेशन, यशवंत सायरे अध्यक्ष, कंचनी फार्मर प्रोड्युसर कंपनी ली श्री बालाजी धोबे सी ई ओ कंचनी फार्मर प्रोड्युसर कंपनी बघेले डायरेक्टर कंचनी फार्मर प्रोड्युसर कंपनी, शंकर तोटावार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी चंद्रपूर, डॉ. व्ही श्रीधर (एस जी एम , एन डी डी बि नागपूर पी डी वि एम डी डी पी , वरभे कृषी अधिकारी वरोरा, खोब्रागडे वनरक्षक वरोरा, शंखपाल एन डी डी बि नागपूर, फेड्रिक एन डी डी बि नागपूर , या चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी बांधव व अंबुजा सिमेंट फाऊंडेशन वरोरा संपूर्ण टीम या शेतकरी मेळावा उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना मंगेश ठोंबरे यांनी केली. तोटावार यांनी वरोरा तालुका व चंद्रपूर जिल्हा घेण्यात येणाऱ्या पीक कापूस व सोयाबीन पीक अष्टसुत्री व्यवस्थापन वर मार्गदर्शन केले. यशवंत सायरे यांनी कांचनी फार्मर प्रोडुसर कंपनी या एफ पी ओ स्थापना त्याबद्दल मार्गदर्शन केले. श्रीधर यांनी दुग्धव्यवसाय बद्दल मार्गदर्शन केले. बालाजी धोबे यांनी एफ पी ओ च्या संक्षिप्त कामे व अनामत ठेवण्यात येणाऱ्या धान्य या बद्दल मार्गदर्शन केले. सुभाष बोबडे यांनी शेती पूरक व्यवसाय व वातावरण पूरक शेती या वर मार्गदर्शन केले आणि अखेर प्रमोद मेश्राम यांनी अध्यक्ष भाषण करून कार्यक्रमाची सांगता केली. या मेळाव्यात वरोरा, भद्रावती, चिमूर, चंद्रपूर, या तालुक्यातील शेतकऱ्यांचा सहभाग होता. उपस्थित शेतकरी व अंबुजा सिमेंट फाऊंडेशन उत्तम कापूस वरोरा टीम.



## हिंगणघाट तालुक्यातील धोची गावातील कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात भाजपा प्रवेश

**हिंगणघाट | प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात दिवसेंदिवस भाजपाचा मोठया प्रमाणात विस्तार होत असून विधानसभा क्षेत्रातील नागरीक तसेच युवा कार्यकर्ते आ.समिर कुणावार यांचे नेतृत्वावर विश्वास व्यक्त करीत मोठया प्रमाणात भारतीय जनता पक्षात प्रवेश करीत आहेत.

दि. २९ रोजी हिंगणघाट, समुद्रपुर, सिंदी रेल्वे विधानसभा क्षेत्रातील धोची येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी आ. समीर कुणावार यांचा विधानसभा क्षेत्रातील लोकाभिमुख विकास तसेच कार्यसम्राट आमदार यांची कार्यशैली पहाता मोठ्या संख्येने भाजपात प्रवेश केला.सदर प्रवेश सोहळा दि. २९ रोजी आ. समीर कुणावार यांच्या स्थानिक जनसंपर्क कार्यालयात प्रवेश सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.याप्रसंगी प्रामुख्याने गजानन कोसरे, नामदेव बावणे ,अतुल कोल्हे, गजानन दाते, वीरेंद्र बावणे, मारोती बावणे ,सुभाष बावणे, दिगंबर गाढवे, विशाल बावणे, विलास पढाल ,दीपक भोयर, किसना दाते, उत्तमराव बावणे, दामू उमाटे, प्रवीण निशाने, धनराज भुजाडे, गौरव बावणे, जनार्धन बावणे ,अमोल मोहजे ,आशा कोल्हे, रंजना पढाल, संगीता सोनटक्के , सुरेखा बावणे, रत्नमाला भोयर, अंजली बावणे , लताताई कोसरे, संजय भेदूरकर, नगाजी उघडे इत्यादी कार्यकर्त्यांना रितसर भाजपात प्रवेश देण्यात आला.उपरोक्त कार्यक्रम आमदार समीर कुणावार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.उपरोक्त कार्यक्रमाचे वेळी आ.समीर कुणावार यांचेसह हिंगणघाट तालुका भाजपा अध्यक्ष विनोद विटाळे, अनुलोमचे प्रवीण पोहणे, विशाल मुटे , समाजसेवक सुनील डोंगरे, अमोल खंदार , माजी नगरसेवक देवा पडोळे, अमोल त्रिपाठी संदेश ससाणे इत्यादी भाजपा पदाधिकारी तसेच जेष्ठ कार्यकर्ते सदर कार्यक्रमाला उपस्थित होते.



## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, खेमजई येथे बाल आनंद महोत्सव

**शेगाव | प्रतिनिधी**

दि.२३ जानेवारी ते २६ जानेवारी २०२४ पर्यंत दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील बाल आनंद महोत्सव २०२४ चे आयोजन जि. प. उ. प्रा.शाळा खेमजई द्वारा करण्यात आले होते.पहिल्या दिवशी दि.२३ जानेवारी २०२४ ला कार्यानुभव विषयांतर्गत कागदकाम आणि मातकाम करण्यात आले.विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वस्तूंची नंतर प्रदर्शनी लावण्यात आली.प्रदर्शनीचे मूल्यमापन करण्यात आले.त्यानंतर मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले.त्यात बॉल पासिंग,दोरीवरच्या उड्या आणि रिले रेस इ.चा समावेश होता.यात वर्ग १ली ते ७वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

दुसऱ्या दिवशी दि.२४ जानेवारी २०२४ ला आम्ही उद्योजक (खरी कमाई) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा माधुरी चौधरी, शा.व्य.स.अध्यक्षा होत्या.उद्घाटिका मनिषा चौधरी सरपंचा ग्रा.पं.खेमजई या होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच चंद्रहास मोरे, पोहा येथिल सरपंचा माया झाडे, पोलीस पाटील विश्वनाथ तुराणकर, शंकर धोत्रे,नथ्थूजी घरत व शा.व्य.स.चे सदस्य इ.मान्यवरांनी हजेरी लावली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजू जांभूळे स.शिक्षक यांनी तर आभारप्रदर्शन ईश्वर टापरे स.शिक्षक यांनी केले.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण १७ स्टॉलची स्वतः कल्पकतेने निर्मिती केली.झुनका भाकर,आलू पराठा,भेळ,बॉईल अंडी, बासुंदी,गूपचूप, आलूबोंडे,आलूभजे, कच्चा चिवडा-नरडे,गुळाचा चहा,निंबूशरबत, कवठाची कळी,मॅगी, मसाला भात कळी,पुरी भाजी, इडली, ब्रेड पकोडे,मठ्ठा इ.खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले. विद्यार्थ्यांनी खाद्य पदार्थांची कृती,महत्व इ.माहिती सांगितली.प्रत्येक स्टॉल प्रमुखांनी मास्टर शेफ कॅप,एपरन आणि हातात हातमोजे घातलेले होते.स्वच्छतेची पूर्ण काळजी विद्यार्थ्यांनी घेतली होती.स्टॉल सजावटीसाठी क्रमांक देण्यात आले.त्यात झुनका भाकर प्रथम क्रमांक,आलू पराठा द्वितीय क्रमांक, भेळ या स्टॉलला तृतीय क्रमांक देण्यात आला. विद्यार्थ्यांनी एकूण ६७४० रू.चे भांडवल उभे केले.एकूण विक्री १३ हजार ६७५रूपये झाली.निव्वळ नफा ६ हजार ९३५ रुपये झाला.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान मिळाले. विद्यार्थ्यांनी सजवलेल्या स्टॉलला क्रमांक देण्यात आले.त्यात झुनका भाकर प्रथम क्रमांक,आलू पराठा द्वितीय क्रमांक, भेळ तृतीय क्रमांक देण्यात आला.दि.२६ जानेवारी २०२४ गणराज्य दिन साजरा करण्यात आला.रात्री ७ वा.सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असे की, संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फक्त विद्यार्थ्यांनीच केले. वैयक्तिक, सामुहिक नृत्य, सामजिक नाटिका 'मला माणूस बनायचंय' वर्ग ३,४,५ वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केली.सोबतच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जिवन संघर्ष सांगणारी ऐतिहासिक नाटिका 'मूकनायक' सादर करण्यात आली.सादरीकरण वर्ग ६, ७वीच्या विद्यार्थ्यांनी केले.सलग तीन तास मनोरंजन, शिक्षण आणि प्रबोधनाचा सुरेख संगम साधण्यात आला.या कार्यक्रमासाठी गावातील तथा शेजारी गावातून फार मोठा प्रेक्षकवर्ग एकवटला होता.अशाप्रकारे बाल आनंद महोत्सव २०२४ च्या यशात शा.व्य.समिती,ग्रा.पं.खेमजई, गुरुदेव सेवा मंडळ,वीर बिरसा क्रीडा मंडळ, महिला बचतगट आणि खेमजई ग्रामस्थांचा फार मोठा वाटा आहे.मुख्याध्यापक रामकृष्ण बलकी यांच्या नेतृत्वाखाली चेतना मून स.शिक्षिका,अनिल वाघमारे वि.शिक्षक यांनी आपली जबाबदारी पार पाडली.



## भिसी येथे प्रा.नितेश कराळे यांचे जाहीर व्याख्यान



**चिमूर | प्रतिनिधी**

रोजगार व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, भिसी, ता. चिमूर, जि. चंद्रपूर यांच्या सयुक्त विद्यमाने भिसी येथे २९ जानेवारीला अबे पोटे हो फेम प्रा. नितेश कराळे (संचालक, फिनिक्स अकॅडमी, वर्धा) जाहिर व्याख्यान या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांना तसेच बेरोजगार युवकांना शैक्षणिक दृष्ट्या विविध प्रकारचे मार्गदर्शन प्राध्यापक नितेश कराडे यांनी केले .

या कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. सतीश वारजूकर चिमूर विधानसभा समन्वयक, तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या हस्ते संपन्न झाले अध्यक्ष स्थानी डॉ. अविनाश वारजुकर माजी मंत्री तथा महासचिव महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी, डॉ. नामदेव किरसाण महासचिव महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमिटी, महेंद्र ब्राम्हणवाडे कांग्रेस कमिटी जिल्हा अध्यक्ष गडचिरोली,विजयकुमार घरत, अधिसभा सदस्य,गोडवाना विद्यापिट, गडचिरोली प्रा. डॉ. नत्थुजी गिरडे, कला व वाणिज्य शब्द, भिसी सचिन गाडीवार, सामाजिक कार्यकर्ता भिसी, कादरबा शेख, जेष्ठ नाट्यु रंगकर्मी, भिसी,मा. विजयजी गावंडे, तालुका अध्यक्ष कांग्रेस कमिटी चिमूर ,विजय मेहर, शहर अध्यक्ष भिसी चिमूर,प्रदिपजी कामडी माजी सदस्य पंचायत समिती चिमूर,झाडे काकाजी ,गरीबा निमजे, अध्यक्ष चिवुल रुखमाई देवस्थान, भिसी, व गावातील तसेच परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक तसेच नागरिक उपस्थित होते

## बजरंग दलाच्या सदस्यांनी दिले ५ गौ वंशाला जीवनदान



**वर्धा | प्रतिनिधी**

अवैध रित्या गौ वाहतूक होत असल्याची माहिती विष्णुप्रसाद भारती बजरंग दल अध्यक्ष यांना मिळताच प्रशासनाला माहिती देऊन.पोलीस प्रशासन व बजरंग दल सदस्यांनी ५ गौ वंश ची सुखरूप सुटका करून लहानू महाराज टाकरखेड (आर्वी ) येथे सोडून दिले. बजरंग दल कारंजा शाखा सदस्यांनी कारंजा (घाडगे )तालुक्यातील जिल्हा वर्धा ठानेगाव रोड नजीक एम एच ए बी १०३९ महिंद्रा बोलेरो गाडीचा पाठलाग करून या गाडीत गाई नेताना रंगेहात पकडले. बोलेरो गाडीमध्ये ५ गाई होत्या. बजरंग दल सदस्यांनी गाडी थांबविल्याबरोबर चालकांनी पळ काढला. गौ वंशाचा जीव वाचवण्यात बजरंग दल ला यश मिळाले. विष्णुप्रसाद भारती (बजरंग दल अध्यक्ष )यांच्या मार्गदर्शन मध्ये ५ गौ वंश सुखरूप जीव हत्या होण्या पासून वाचवण्या मध्ये यश आले असून टाकरखेड(आर्वी )येथील गौ शाळेत पाच गाईंना सुखरूप बजरंग दल सदस्यांनी व पोलीस प्रशासनानी सोडून दिले .

## चिरादेवी गावानजीक शेत शिवारात वाघाचा दिवसाढवळ्या वावर

### शेतात जाण्यासाठी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**भद्रावती | प्रतिनिधी**

तालुक्यातील चिरादेवी येथे मागील एक महिन्यापासून चिरादेवी शेत शिवारात वाघाचा दिवसा ढवळ्या वावर असून शेतकरी शेतमजूरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या शेतीचे कामे युद्धपातळीवर सुरू असून शेतकरी शेतामध्ये जाण्यास धजावत नाही. मंजूरांनी सुद्धा शेतीच्या कामाकडे पाठ फिरवली आहे. चिरादेवी या गावात दुग्धव्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. त्याचसोबत शेळीपालन व्यवसाय सुद्धा बऱ्यापैकी आहे. शेतकऱ्यांना जनावरे व बकरी चारण्यासाठी लोकांना पडीत जमीन व जंगलाचा आधार घ्यावा लागतो. परंतु नेमक्या त्याच ठिकाणी वाघाचा वावर आहे. त्यामुळे गुराख्याला गुरे चारण्यासाठी जावं कि नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे.

मागील आठ दिवसापूर्वी चिरादेवी येथील शेतकरी प्रकाश आत्राम यांची कालवड सुद्धा



वाघाने फस्त केली आहे. त्याचदरम्यान गोरजा येथील २ बकऱ्या मारल्या. हि गोष्ट ताजी असताना काल रविवारी सांयकाळच्या सुमारास शेतकरी विठ्ठल उपरे घराकडे गुरे घेऊन जात असताना त्यांच्यावर हमला केला. परंतु त्यांनी सावधगिरी बाळगल्याने थोडक्यात बचावले आहे. तसेच दिवसेंदिवस हमले होत राहीले आणि दुधाळ जणांवरावर वाघांनी हमला केला तर त्या शेतकऱ्यांचा दुग्धव्यवसाय अडचणीत येईल. आज मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांमध्ये भिस्ती झाली आहे. चिरादेवी, गवराळा, गोरजा येथील शेतकऱ्यांना जीव धोक्यात घालून शेतकाम करावी लागतं. वनविभागाने याकडे लक्ष देऊन वाघाचा बंदोबस्त करावी, अशी मागणी चिरादेवी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.


> मागील एक महिण्यापासून चिरादेवी शेत शिवारात वाघाची दहशत सुरु आहे. रोज जनावरांवर हमले होत आहे. काल रविवारी सायंकाळी घराकडे गुरे घेऊन जात असताना वाघांनी माझ्यावर हमला केला. मी सावधगिरी बाळगल्याने थोडक्यात बचावले. चार - पाच शेतकऱ्यांनी त्याला हुसकावून लावले. असे हमले होत राहिले तर आम्ही जनावरे चारायचे कसे ? वनविभागाने याकडे लक्ष देऊन वाघाचा बंदोबस्त करावा..
>
> **विठ्ठल उपरे - गुराखी चिरादेवी**

# हरिश्चंद्राच्या अद्भुतरम्य कथेचे वेडे!

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म दि.२ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे एका सुसंस्कृत व प्रतिष्ठित कुटुंबात झाला. गांधी हे वैष्णव वाणी होते. गांधीजींचे आजोबा उत्तमचंद यांना पोरबंदर संस्थानची दिवाणगिरी मिळाली होती. गांधींचे वडील करमचंद हे प्रथम पोरबंदर संस्थानचे व नंतर राजकोट संस्थानचे दिवाण होते. आई पुतळाबाई व वडील हे दोघेही शीलसंपन्न व धर्मनिष्ठ होते. ते नियमाने धार्मिक ग्रंथांचे पठन करीत व आपल्या मुलाबाळांना धार्मिक कथा सांगून सदाचरणाचे महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवीत. त्या वेळी धार्मिक नाट्यप्रयोग फार होत असत; ते पाहण्यात आणि ध्रुव, प्रल्हाद, हरिश्चंद्र यांच्या कथा ऐकण्यात मोहनदास बाळपणी सातआठ वर्षांचे असताना रंगून जात. हरिश्चंद्राच्या अद्भुतरम्य कथेचे त्यांना वेडच लागले होते. हरिश्चंद्र नाटक त्यांनी वारंवार पाहिले. अहिंसात्मक सत्याग्रहाला आवश्यक निष्ठेची मनोभूमिका लहानपणीच तयार झाली. कस्तुरबा आणि मोहनदास यांचे वय सारखेच होते. या दोघांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी झाला. ही विद्यार्थी दशा होती. घरचे वातावरण शीलसंपन्नाचे असले, तरी बाहेरचे सवंगडी आणि मित्र निरनिराळ्या कौटुंबिक परिस्थितीत होते. त्यांनी मांसाहार, धुम्रपान, वेश्यागमन इ.गोष्टींचे प्रलोभन मोहनदासांना दाखविण्याचा प्रयत्न केला. ते त्यात काही काळ फसलेही. परंतु तीव्र पश्चात्ताप होऊन ते त्यातून लवकरच बाहेर पडले. सन १८८७ साली ते मॅट्रिकच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. सन १८८५मध्येच पिता- करमचंद यांचे निधन झाले. बेचरजी स्वामी यांनी पुतळाबाईंना सांगितले, की मोहनदासाला उच्च वैद्यकीय शिक्षणाकरिता इंग्लंडला पाठवावे. परंतु वैद्याला मृत शरीराला स्पर्श करावा लागतो हे बरे नव्हे, म्हणून बॅरिस्टर होण्याकरिता इंग्लंडला पाठवावे, असे वडील बंधूंनी ठरविले. मोहनदासांना ही कल्पना फार आवडली. आई या धाकट्याला परदेशी पाठविण्यास नाखूष होती. परंतु मोहनदासांचा आग्रह पाहून तिने त्यांना मद्य, मांस व परस्त्री वर्ज्य करण्याची शपथ घ्यावयास लावली आणि ते सन १८८८मध्ये इंग्लंडला गेले. या वेळी कस्तुरबा गरोदर होत्या. अठराव्या वर्षीच हिरालालचा जन्म झाला. रामदास व देवदास नंतर काही वर्षांच्या अंतराने झाले. इंग्लंडमध्ये असताना गांधींनी शाकाहारी मंडळ स्थापन केले. वडिलांच्याच पायापाशी बसून हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती मित्रांच्या संवादांमध्ये अनेक धर्मांच्या तत्त्वांचे विचार त्यांनी वारंवार ऐकले, ते इंग्लंडमध्ये गीता, बुद्धचरित्र व बायबलयांच्या वाचनाने अधिक दृढ झाले. ते दि.१० जून १८९१ रोजी बॅरिस्टर झाले. तत्पूर्वी लंडनची मॅट्रिक परीक्षाही ते उत्तीर्ण झालेच होते. स्वदेशी परतले. मातेचे निधन झाले होते, ही गोष्ट त्यांना परतल्यावर कळली. वडीलभावाने परदेशगमनाबद्दल त्यांच्याकडून प्रायश्चित्त घेवविले.

भारतात आल्यावर त्यांनी मुंबई येथे वकिली सुरू केली; पण जम बसेना. या वेळी इंग्रजी पद्धतीचा पोषाख ते करीत होते. पोरबंदराच्या एका मुसलमान व्यापाऱ्याने दक्षिण आफ्रिकेतील कज्जासाठी गांधींची गाठ घेतली व एका वर्षाच्या कराराने, सन १८९३च्या एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेत नेले. दरबानचा लक्षाधीश व्यापारी दादा अब्दुल्ला याने प्रिटोरिया येथील व्यापारी तय्यबजी यावर ४० हजार पौंडांची फिर्याद केली होती. गांधींनी त्या दोघांचे मन वळवून कज्जाचा निकाल सामोपचाराने करवून घेतला. आफ्रिकेत सुमारे २० वर्षे गांधी राहिले. वकिलीचा अनुभव घेतला. दोन्ही पक्षांच्या अंतःकरणात शिरून व समजूत घालून, कज्जाचा निकाल करणे यात गांधी तरबेज झाले. दक्षिण आफ्रिकेत असताना तेथील बिनगोऱ्या जमातींवरील विशेषतः हिंदी लोकांवरील, त्याचप्रमाणे तेथील मजुरांवरील होणाऱ्या गोऱ्या सत्ताधाऱ्यांच्या जुलमांविरुद्ध आपल्या सत्याग्रहाचा किंवा निःशस्त्र प्रतिकाराचा दीर्घकालपर्यंत प्रयोग करण्याची संधी त्यांनी साधली. तेथील हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती इ. जमातींची व दलित जनांची अंतःकरणे काबीज केली. अनेक यूरोपीय मित्रही मिळविले. दक्षिण आफ्रिकेत प्रसिद्ध तत्त्वज्ञ, सेनापती व सत्ताधारी जनरल स्मट्स यांच्याशीच गांधींनी अनेक वेळा सत्याग्रही संग्राम केला. त्या वेळी नाताळ, ट्रान्सवाल व ऑरेंज फ्री स्टेट या तीन स्वतंत्र राज्यांत हिंदी लोकांची स्थिती अस्पृश्यांपेक्षाही वाईट होती. हिंदू मजूर मुदतीच्या कराराने तेथे मोठ्या संख्येने नेले जात होते. हिंदी व्यापारीही तेथे व्यापाराकरिता वस्ती करून राहिले होते. सर्वच बिनगोऱ्या लोकांना निग्रोंप्रमाणेच वागवीत असत; सर्वांनाच कुली म्हणत. गोऱ्या वस्तीत राहण्याचा त्यांना प्रतिबंध होता. वर्णद्वेषाचे थैमान सुरू होते. वर्णभेदावर आधारलेले अनेक प्रकारचे जुलमी कर लादले होते. वर्णद्वेषावर आधारलेले नियम मोडले, तर गोरे लोक व पोलीस मारहाण करीत; बुटाने तुडवीत.

गांधींनी स्वतः अनेक वेळा असा अपमान व मारहाण सोसली. हिंदू लोकांच्या काही सवलती काढून घेणारे अपमानकारक बिल तेथील विधिमंडळात सन १८९४मध्ये आले. गांधी त्या वेळी आफ्रिका सोडून स्वदेशी परतणार होते. परंतु आयत्या वेळी परत येण्याचा बेत रहित करून तेथेच राहून लढा देण्याचा संकल्प त्यांनी सोडला. नाताळ इंडियन काँग्रेस नावाची संस्था त्याकरिता स्थापन केली. सार्वजनिक फंडातील पैसा न घेता वकिली सुरू करून अगदी साधी राहणी अवलंबिली. इंडियन ओपिनियन हे वृत्तपत्र सुरू केले. सार्वजनिक फंड आंदोलनाकरिता गोळा होत असे; त्याचा पूर्ण चोख हिशोब प्रतिमास सादर करण्याची प्रथा ठेवली. मजुरांवर तेथे राहण्याबद्दल जादा कर देण्याचे विधेयक विधिमंडळापुढे मान्य झाले होते. याविरूद्ध त्यांनी मोठी चळवळ केली. गोरे लोक त्यामुळे त्यांच्यावर खूप चवताळले होते. याच सुमारास सन १८९६च्या जून महिन्यात गांधी भारतीयांना तेथील परिस्थिती समजावून सांगण्याकरिता तात्पुरते भारतास परतले. काही महिने भारतात राहून येथील वृत्तपत्रांत तेथील परिस्थितीबद्दल हृदयविदारक हकीकती त्यांनी प्रसिद्ध केल्या व दक्षिण आफ्रिकेत ते पुन्हा गेले. याच सुमारास बोअर युद्ध सुरू झाले. त्यात गांधीजींनी हिंदी लोकांचे शुश्रूषा पथक तयार करून दोन्ही बाजूंच्या गोऱ्या जखमी सैनिकांची सेवा केली. बोअर युद्धानंतर गांधींनी भारताला भेट दिली. सन १९०३ साली गांधी आफ्रिकेस पुन्हा परत गेले. तेथील दडपशाहीच्या कायद्याविरूद्ध त्यांनी सत्याग्रहाची चळवळ उभारली. त्यात कस्तुरबांसह अनेक स्त्रियांनीही भाग घेतला आणि कारावास भोगला. काळ्या कायद्याविरुद्ध कायदेभंगाच्या चळवळीला सन १९०७मध्ये उग्ररूप आले. सन १९०८मध्ये शेकडो हिंदी लोकांना कारावासाच्या शिक्षा झाल्या. गांधींनाही सक्तमजुरीची शिक्षा झाली. या



सत्याग्रहाचे पडसाद आफ्रिकेप्रमाणेच इंग्लंड व हिंदुस्थान येथेही उमटले. सन १९१२साली गोपाळकृष्ण गोखले हे जनरल स्मट्सने काळा कायदा रद्द करावा, म्हणून आफ्रिकेत गेले. तेव्हापासून गांधी व गोखले यांचा स्नेह जमला. गोखले यांस गांधींनी आपले राजकीय गुरू म्हणून अत्यंत पूज्य मानले. दि.१८ डिसेंबर १९१३ रोजी गांधींना स्मट्सने बंधमुक्त केले व दि.२१ जानेवारी १९१४ रोजी वर्णविद्वेषाच्या कायद्याच्या बाबतीत गांधी व स्मट्स यांच्यात तडजोड झाली. आफ्रिकेतील त्यांच्या वीस वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी रस्किनचे अनटू धिस लास्ट, टॉलस्टायचे किंग्डम ऑफ गॉड व थोरोचे निबंध वाचले. रस्किनच्या पुस्तकाचे त्यांनी सर्वोदय म्हणून गुजरातीत भाषांतर केले. दरबान शहराजवळ सुमारे चाळीस हेक्टर जमीन खरेदी करून फिनिक्स आश्रम स्थापन केला. तेथूनच ते इंडियन ओपिनियन हे साप्ताहिक छापून प्रसिद्ध करू लागले. गांधी स्वतः शेतकाम करीत, छापखान्यात यंत्रेही फिरवीत. नंतर त्यांनी जोहॅनिसबर्गजवळ सुमारे ४४० हेक्टर जागेत टॉलस्टाय फार्म स्थापिला. सन १९१३मधील सत्याग्रह आंदोलनाची छावणी येथेच पडली होती. तत्पूर्वी त्यांनी सन १९०८साली लंडनहून दक्षिण आफ्रिकेस परत जात असताना हिंद स्वराज्य हे पुस्तक प्रश्नोत्तररूपाने लिहून प्रसिद्ध केले. या पुस्तकात यांत्रिक उद्योगाने मानवाचा ऱ्हास होत आहे, हा विचार त्यांनी मांडला.


गांधीजी दक्षिण आफ्रिकेला कायमचा रामराम ठोकून इंग्लंडमार्गे दि.९ जानेवारी १९१५ रोजी मुंबईस परत आले. नामदार गोखले यांनी, भारतात गेल्यावर एक वर्षपर्यंत सार्वजनिक चळवळीत न पडता केवळ तटस्थपणे परिस्थिती समजावून घ्या, असे त्यांना बजावून सांगितले होते. मुंबई, मद्रास इ.शहरांमध्ये त्यांच्या सत्काराच्या सभा झाल्या. गांधींनी हरद्वारचे गुरुकुल व शांतिनिकेतन यांस भेटी दिल्या. हरद्वार येथे कांगडी गुरुकुलाचे आचार्य श्रद्धानंद यांची गाठ पडली. त्यांनीच प्रथम गांधींचा महात्मा म्हणून निर्देश करून गौरव केला. अहमदाबाद येथे साबरमती तीरावर दि.२५ मे १९१५ रोजी सत्याग्रहाश्रम स्थापन केला. आश्रमात राहणाऱ्या एका अस्पृश्यामुळे अहमदाबाद येथील व्यापाऱ्यांनी आश्रमास देणग्या देण्याचे बंद केले. आश्रम बंद पडण्याची वेळ आली. परंतु गांधींनी अस्पृश्यांना आश्रमात ठेवण्याचा आग्रह चालू ठेवला. हळूहळू पुन्हा अनुदान मिळू लागले व आश्रम स्थिरावले. विनोबा भावे, काकासाहेब कालेलकर, संगीतज्ञ खरे गुरूजी, गोपाळराव काळे, महादेवभाई देसाई, जे.बी.कृपलानी, किशोरलाल मश्रुवाला, प्यारेलाल इ.गांधींचे अनुयायी आश्रमी बनले. अनुयायी त्यांना साबरमतीचे संत संबोधू लागले. हा सत्याग्रहाश्रम तेव्हापासून हळूहळू भारताच्या राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे मुख्य केंद्र बनला. हिंदू विश्वविद्यालयाचा स्थापना समारंभ दि. ४ फेब्रुवारी १९१६ रोजी झाला; त्या सभेत व्हाइसरॉय लॉर्ड होर्डिंग, एनी बेझंट, हिंदी महाराजे, त्यांच्या राण्या, उच्चपदस्थ अधिकारी व अनेक पुढारी उपस्थित होते. या सभेत गांधींनी भाषण केले. ते म्हणाले, कालच्या चर्चेमध्ये भारताच्या गरिबीबद्दल मुक्त कंठाने भाषणे झाली. पॅरिसच्या जवाहिऱ्यालाही दिपवून टाकणाऱ्या जडजवाहिरांनी मंडित राजेमंडळी येथे बसलेली आहेत. भारताची गरिबी नष्ट करावयाची तर अगोदर, डोळे दिपविणारे जडजवाहिर राजे महाराजांपाशी आहेत, तेच काढून घेऊन याचा भारताच्या जनतेकरिता निधी निर्माण करावा. हे सर्व धन गरीब शेतकऱ्यांच्या श्रमातून निर्माण झाले आहे. शेतकऱ्याची मुक्ती शेतकरीच करू शकेल. वकील, डॉक्टर, जमीनदार हे करू शकणार नाहीत. अशा अर्थाचे भाषण चालू असताना एनी बेझंट यांनी गांधींना हटकले व भाषण बंद करण्यास सांगितले. गांधी थांबले नाहीत. बेझंटनी ती सभा रागावून बरखास्त केली. गांधींनी सन १९१७मध्ये शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी बिहारमधील चंपारण्यास भेट दिली. त्या परिसरात गोऱ्या लोकांचे उसाचे व निळीचे मळे होते व तेथील हिंदी शेतकरी त्यांची कुळे होती. हे मळेवाले शेतकऱ्यांना छळीत, लुबाडीत, मारीत व त्यांची आर्थिक पिळवणूक करीत. ब्रिटिश सरकारने गांधींना चंपारण्य सोडून जाण्याचा हुकूम दिला. तो गांधींनी मानला नाही. या वेळी राजेंद्रप्रसाद, ब्रिजकिशोर, मझरूल हक इत्यादींचा परिचय झाला. चंपारण्य जिल्ह्यातील ८५० खेड्यांतील सुमारे ८,००० शेतकऱ्यांच्या तक्रारी गांधींनी लिहून घेतल्या. दि.१३ जून १९१७ रोजी सरकारला चौकशी समिती नेमावी लागली. समितीच्या शिफारशीप्रमाणे सरकारने शेतकऱ्यांकडून खंड कमी घेतला जाईल, वेठबिगार रद्द होईल व इतर जुलमी प्रकार होणार नाहीत, असे १८ ऑक्टोबर रोजी जाहीर केले.

चंपारण्य सत्याग्रहामुळे गांधीजींचे भारतीय नेतृत्त्व चमकू लागले. त्यानंतर अहमदाबादच्या मजुरांच्या तुटपुंज्या पगाराचा प्रश्न उत्पन्न झाला. युद्धजन्य महागाई शिगेस पोहोचली होती. मजुरांचा ७० टक्के बोनस गिरणीवाल्यांनी रद्द करण्याचे जाहीर केले. सुमारे ८० हजार मजुरांनी सत्याग्रह करण्याचा बेत केला. बावीस दिवस संप चालला. गांधींनी मजुरांचा संप टिकविण्यासाठी उपोषण केले. तीन दिवसांत यश आले. मालकांनी ३५ टक्के पगारवाढ मान्य केली. असे तंटे पुन्हा होऊ नयेत म्हणून मजुर-महाजन नावाची संस्था स्थापन झाली. मजुरांप्रमाणे शेतकऱ्यांचाही प्रश्न याच साली उत्पन्न झाला. खेडा जिल्ह्यात भयंकर दुष्काळ पडला तरी सरकार, चार आणेच पीक येऊन देखील, शेतसारा वसूल करू लागले. गांधींनी करबंदीची चळवळ हाती घेतली. ही चळवळ पसरू लागली, म्हणून सरकार नमले व शेतसारा माफ झाला. पहिल्या जागतिक युद्धात भारतीयांनी मित्र राष्ट्रांना मदत करावी, म्हणून सन १९१७ साली व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड याने भारतीयांची परिषद बोलाविली. त्या परिषदेत गांधींनी हिंदीमध्ये भाषण करून सैन्यभरतीला पाठिंबा दिला. या बाबतीत लोकमान्य टिळकांचे असे म्हणणे होते, की भारतीयांना स्वराज्याच्या अधिकारांचे आश्वासन मिळाले, तरच सैन्यभरतीला पाठिंबा द्यावा. गांधींनी बिनशर्तच पाठिंबा दिला. दक्षिण आफ्रिकेतील चळवळीपासून गांधींचा व दीनबंधू सी.एफ.अँड्रूज या ख्रिस्ती धर्मप्रचारकाचा स्नेह जमला होता. ब्रिटिश सरकारचे भारतातील प्रतिनिधी आणि गांधी यांच्यामधला अँड्रूज हे एक महत्त्वाचा दुवा बनले. सैन्यभरतीच्या प्रचाराकरिता देशभर फिरत असता गांधींची प्रकृती अत्यंत परिश्रमाने ढासळली. अतिसाराचा विकार जडला. अंगात बारीक तापही सारखा राहू लागला. खेडा जिल्ह्याच्या सत्याग्रहापासून वल्लभभाई पटेल यांचा स्नेहसंबंध वाढू लागला होता. वल्लभभाई अहमदाबादला गांधींना भेटावयास आले. वल्लभभाईंनी औषधोपचार घ्यावा, असा त्यांना आग्रह केला. सुप्रसिद्ध डॉ.कानुगा यांनी प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी म्हणून औषधे व इंजेक्शन्स घेण्याचा आग्रह केला. गांधींनी तो नाकारला. एके दिवशी रात्री या दीर्घ आजारात गांधींना वाटू लागले, की आपली अखेरची वेळ आली आहे. वल्लभभाईंनी पुन्हा डॉ.कानुगांना प्रकृती तपासण्यास बोलाविले, त्यांनी नाडी तपासली. डॉक्टर म्हणाले, तशी भीती नाही, अत्यंत अशक्ततेमुळे मात्र मज्जातंतू क्षीण झाले आहेत. शेवटी एकच उपाय उपयोगी पडला; सर्व शरीराला बर्फाचा लेप केला होता. गांधी या आजारातून बाहेर पडले. निसर्गोपचारावर त्यांची फार भिस्त. आश्रमात कोणी आजारी पडले, तरी उपवास व निसर्गोपचार यांवरच ते भर देत. क्रमशः.....

!! पावन पुण्यस्मरणनिमित गांधीजींना विनम्र अभिवादन !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–**
**गोविंदा निकोडे गुरुजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३**

# महात्मा गांधीजींना अभिप्रेत रामराज्य



''माझ्या रामराज्यात राजापासून रंकापर्यंत सर्वांना समान हक्क असतील.'' – महात्मा गांधी

आज ३० जानेवारी महात्मा गांधी यांची ७६ वी पुण्यतिथी. भारतात हा दिवस शहीद दिन म्हणून साजरा केला जातो. गेल्या आठवड्यात आयोध्यात राममंदिर लोकार्पण सोहळा संपन्न झाला. आणि देशात पुन्हा एकदा राम, रामायण आणि रामराज्याच्या विचार मंथनला सुरूवात झाली. भारतात विसाव्या शतकात राम आणि रामराज्याचा विचार मांडणारे महात्मा गांधी हे राजकीय नेते, अराज्यवादी व आदर्शवादी राजकीय विचारवंत होते. आजच्या या पार्श्वभूमीवर महात्मा गांधीजींचे रामराज्य संबंधीचे विचार जाणून घेणे महत्वाचे वाटते. महात्मा गांधीजींना अभिप्रेत स्वराज्य तथा आदर्श राज्य हे रामराज्य आहे. रामराज्य हे वर्गविरहीत आणि समताधिष्टीत असेल. गांधीजींनी 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात, 'यंग इंडिया' आणि 'हरिजन' या नियतकालिकांत रामराज्यासंबंधी त्यांनी विचार मांडले आहेत. रामराज्यात प्रजेला महत्वाचे स्थान असून ते नीती व मर्यादेवर आधारीत आहे, या राज्यात अभिव्यक्तीचा अधिकार प्रत्येकाला असला पाहिजे, तसेच प्रेम आणि सद्भावना हा रामराज्याचा पाया असेल. अस्पृश्यता, मद्यप्राशन या गोष्टीला थारा असणार नाही. ही अपेक्षा गांधीजींची व्यक्त केली होती.१९२९ मध्ये यंग इंण्डियात महात्मा गांधींनी रामराज्य विषयी स्पष्ट केले की, राम राज्याचा अर्थ हिंदू राज्य नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ ईश्वरीय राज्य भगवानाचे राज्य, माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीवर असतील अथवा नसतील रामराज्याचा प्राचीन आदर्श निःसंदेह एक खरे लोकतंत्र आहे. ज्यात गरिबांतील गरीब नागरीकांना न्याय मिळाला पाहिजे. २ ऑगस्ट, १९३४ च्या 'आनंद बाजार पत्रिका' मध्ये गांधीजी लिहितात, माझ्या स्वप्नातील रामायणात राजपुत्र आणि रंक या दोघांनाही समान अधिकारांची खात्री दिली जाते. १ जून, १९४७ रोजी गांधीजींनी 'हरिजन' मध्ये लिहिले, ऐश्वर्यात लोळणारे काही लोक आणि पुरेसे अन्नही न मिळणारे सामान्य नागरिक अशा अन्यायकारक असमानतेच्या काळात रामराज्य अस्तित्वात येणे शक्य नाही. ते पुढे म्हणतात, ही पृथ्वी परमेश्वराची आहे, हे इथे राहणारे सर्व मानव एक आहेत. प्रत्येक गाव स्वयंपूर्ण आणि समानतेने सुखी व्हावे, हे माझ्या स्वप्नातील रामराज्य आहे, हे गरीब माणसाचे स्वराज्य आहे. श्रीमंतांना ज्या सुखसोयी उपभोगता येतात, त्या सुखसोयी गरीब जनतेला सुद्धा उपभोगता आल्या पाहिजेत. याचा अर्थ त्यांनीही राजवाड्यात राहावे असा होत नाही. पण प्रत्येक व्यक्तीला सर्वसामान्य सुखसोयींचा लाभ झाला पाहिजे. तो होईल तेव्हाच संपूर्ण स्वराज्य लाभले असे मी म्हणेन. ज्या



**डॉ. प्रकाश खेत्री,**
**छ. संभाजीनगर,**
**७८४३०९२२४४**

राज्यात व्यक्तीस्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य मानले जाते, तसेच उच्च-नीचता, गरीब- श्रीमंत, स्त्री-पुरुष, वंश आणि पंथ यावरुन भेदाभेद केला जात नसेल. या रामराज्यात सर्व जमीन आणि शासनव्यवस्था लोकांच्या हाती असेल. आदर्श राज्यातील न्यायव्यवस्था ही साधी, सरळ, सोपी आणि कमीत कमी खर्चाची व विलंब न करणारी असेल. प्रत्येक खेड्यामध्ये आणि जिल्ह्यामध्ये शक्यतो पंचकमिटीच्या सहाय्याने निवाडे होतील. विशेष परिस्थितीतच त्यांना प्रांतीक न्यायालयात अपील करण्याठी परवानगी द्यावी. तसेच गांधीजींच्या मते न्यायालयातील वकिलांची फी कायद्याने निश्चित करावी. तेव्हा न्याय त्वरित आणि कमी खर्चात मिळेल. गुन्हेगाराला गुन्ह्यानूसार शिक्षा तर झालीच पाहिजे. तुरुंगात गुन्हेगारावर सुधारात्मक उपाय केले जावेत. असे गांधीजींचे मत होते.रामराज्यातील कायदे म्हणजे नैतिक नियम असतील, नागरिकांना उपासनेचे, विचारांचे आणि लेखनाचे स्वातंत्र्य असेल, खेडे समृद्ध, सुखी आणि स्वयंपूर्ण असतील. सत्य आणि अहिंसा हा राज्याचा पाया असेल, ज्या राज्यात प्रत्येक व्यक्तीला निर्भयतेने आणि स्वतंत्रपणे राहता येईल, महात्मा गांधीजीनी खेडेगांव हे केंद्रबिंदू मानले. कारण गांधीजींच्या मते, खरा भारत हा शहरात नसून खेड्यात आहे. खेड्यांना जास्तीत जास्त स्वायत्ता मिळावी. खेड्यांचा कारभार लोकांनी निवडून दिलेल्या पंचायतीमार्फत चालवावा. खेड्यांनी आपल्या जिल्हयाचा कारभार चालविणारी जिल्हा मंडळे निवडावीत. जिल्हा मंडळांनी प्रांतिक मंडळे, प्रांतिक मंडळांनी मध्यवर्ती मंडळ व त्याचा अध्यक्ष निवडावा अशी शासनव्यवस्था त्यांनी सुचविली. खेडयांना दिले जाणारे स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य असेल. त्यांना पूर्णतः अधिकार असतील, सहकार आणि ग्रामपंचायतीच्या सहाय्याने राज्यकारभार चालविण्यात येईल.निवडणुकिसाठी उभे राहणारे उमेदवार हे निस्वार्थी भ्रष्टाचारापासुन मुक्त, चारित्र्यसंपन्न, सेवावृत्तीचे असावेत असा गांधीजींचा आग्रह होता. आपण सुसंस्कृत झाल्याशिवाय आपले स्वराज्य निरर्थक आहे. आपण नैतिकतेला जीवनात सर्वोच्च स्थान द्यायला हवे. प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या जीवनात प्रामाणिकपणा आणि उच्च नैतिक मूल्ये जोपासली पाहिजेत. रामराज्य हे धर्माचे व न्यायाचे राज्य होते. अशा रामराज्याची स्थापना करणे हे महात्मा गांधींचे स्वप्न होते.महात्मा गांधीजींवर राम आणि रामराज्याचा प्रभाव शेवटच्या क्षणापर्यंत होता. 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात लिहितात, लहानपणी भीती वाटलिकी ते राम मनामाचा जप करत, त्यांच्या संपूर्ण आयुष्यात 'मिशन टू मॉस्को' आणि 'राम राज्य' (१९४४ मध्ये) हे केवळ दोनच चित्रपट पाहिले होते, ३० जानेवारी, १९४८ रोजी दिल्लीत मृत्यू समय ' हे राम ' असे म्हटले तर नवी दिल्लीतल्या यमुना नदीच्या तीरावर राजघाट या समाधीस्थळी स्मृतिप्रीत्यर्थ आजही रघुपती राघव राजा राम हे त्यांचे आवडते भजन गायले जाते . गांधीजींची रामराज्याची संकल्पना केवळ रामायणातील राज्याशी किंवा धर्माधिष्ठित राज्याशी संबंधीत नाही, तर त्यांची वैश्वीक धर्मावर श्रध्दा होती. ते सर्व धर्मांच्या श्रध्दा, शिकवण यांचा आदर करीत असत. त्यांना अभिप्रेत रामराज्यात सत्तेचे विकेंद्रीकरण होईल, खेडे स्वयंपूर्ण आणि स्वायत्त होतील. कोणत्याही व्यक्तीलाही इजा पोहचविणारा नाही, जिथे प्रत्येक आवाज ऐकला जाईल, न्याय वेगवान असेल, नीती व मर्यादेवर आधारीत शोषणविरहीत समता मूलक समाज असेल. महात्मा गांधीजींचे हे विचार आजही शाश्वत आणि महत्वपूर्ण वाटतात. तेव्हा महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील रामराज्याची निर्मिती करण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करायला हवेत. हीच खऱ्या अर्थाने त्यांना श्रद्धांजली ठरेल...

## मोतीबिंदू शिबिराच्या नावावर रुग्णांची दिशाभूल

# शस्त्रक्रियेला नेणारी गाडीच न आल्याने रुग्ण आल्यापावली घरी परतले



**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील वढोली येथे ग्रामपंचायतीच्या परिसरात दि.(२५)गुरुवारी मोतीबिंदू तपासणी शस्त्रक्रिया शिबिर पार पडले.रुग्णांची तपासणीही झाली काही रुग्ण पात्र देखील ठरले.रुग्णांना नेण्यासाठी तारीख व वेळही देण्यात आली मात्र शस्त्रक्रियेला नेणारी गाडीच न आल्याने रुग्ण संताप व्यक्त करत आल्यापावली घरी परतले.

महात्मे आय बँक आय हॉस्पिटल नागपूर च्या बॅनर खाली वढोली येथे २५ जानेवारीला सकाळी ८ वाजता ते दुपारी २ वाजेपर्यंत शिबिर ठेवण्यात आली शिबिरात लहान मुलांचा तिरळेपणा,मोतीबिंदू,रेटिना शस्त्रक्रिया अशा अनेक तपासण्या करण्यात आल्या.शिबिरात वढोलीसह परिसरातील अनेक गावातील शेकडो रुग्णांनी तपासणी करून घेतली.पात्र अपात्र सर्वच रुग्णांकडून ३०० रू घेतल्याने फसवणूक झाल्याची शंका रुग्णांनी व्यक्त केली.शिबिरात ४८ रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड झाली.रुग्णांना दि.(२९) सोमवारी सकाळी ९ वाजता डॉक्टरांनी ग्रामपंचायतला बोलाविले शस्त्रक्रियेला नेणारी गाडीच न आल्याने रुग्ण संताप व्यक्त करत आल्यापावली घरी परतले.तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांशी शिबिरा संदर्भात संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.शिबिराच्या ठिकाणी स्थानिक आरोग्य विभागाचे कोणतेही कर्मचारी उपस्थित न्हवते.तालुक्यात नेहमीच असे शिबिर होत असतात मात्र शिबिराची माहिती तालुका आरोग्य विभागाला राहत नसल्याने एकच आश्चर्य व्यक्त होत आहे.

**चार दिवसांपूर्वी वढोलित शिबिर पार पडले.रुग्णांची तपासणी करण्यात आली त्यात निवड झालेल्या रुग्णांना दि.(२९) सोमवारी नेण्यासाठी गाडी पाठवणार असल्याचे सांगण्यात आले.मात्र गाडी आलीच नाही व त्यांच्याकडून ३०० रुपये घेतल्याने फसवणूक झाल्याचे दिसून येत आहे.डॉक्टरांशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.दोन दिवस वाट पाहू त्यानंतर पोलिसात तक्रार दाखल करणार**
**– संदीप लाटकर अध्यक्ष तमुस वढोली**

**शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना न्याय मिळेल या चांगल्या हेतूने शिबिर घेण्यासाठी परवानगी दिली.शिबिरात निवड झालेल्या रुग्णांना न्यायसाठी गाडी न येणे शंकास्पद आहे. फसवणूक झाली असेल तर गावाचा प्रमुख या नात्याने मी स्वत: नागपूर येथे जाऊन प्रकरणाची चौकशी करणार व सर्व रुग्णांना त्यांचे पैसे परत मिळवून देणार न्याय मिळवून देणार**
**– सरपंच राजेश कवठे वढोली**

**गोंडपिपरी तालुक्यात असे अनेक शिबिरे होत असतात.त्यात कित्येकदा जनतेची नाहक फसवणूक केल्या जाते.मोफत शिबिर बॅनर लागले असताना पैसे घेणे योग्य नाही.स्थानिक आरोग्य विभागाला शिबिराची माहिती नसणे हे संतापजनक आहे .**
**–संदीप पौरकर सदस्य ग्रामपंचायत वढोली**

# उमानूर वासीयांना मिळणार पिण्याचे शुद्ध पाणी

## भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते नळ योजनेचे लोकार्पण



**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या उमानूर ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून उमानूर वासीयांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळणार आहे.नुकतेच माजी जि प अध्यक्ष तथा सिनेट सदस्य भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आले.

उमानूर वासीयांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते.येथील नागरिकांनी मागील वर्षी पाण्याची टाकी उभारून नळ जोडणी करण्याची मागणी केली होती.येथील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी गावात ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने जल जीवन मिशन अंतर्गत योजना राबविली.यासाठी मंत्री धर्मराव बाबा अत्राम यांनी कोट्यवधी रुपयांची निधी उपलब्ध करून दिला होता.आता गावकऱ्यांची पिण्याच्या पाण्याची समस्या दूर झाली असून गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.काम पूर्ण होताच माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आले.यावेळी येथील सरपंच श्रीनिवास गावडे,मरपल्लीचे सरपंच अरुण वेलादी,रेगुलवाहीचे सरपंच ममीता नैताम,मरपल्लीचे उपसरपंच धनंजय डोंगरे,उमानूर चे उपसरपंच रवींद्र कोरेत, राष्ट्रवादी काँग्रेसचे अहेरी विधानसभा अध्यक्ष लक्ष्मण येर्रावार,तालुका अध्यक्ष श्रीनिवास विरगोनवार तसेच उमानुर ग्रामपंचायत चे सदस्य तसेच प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# वझुर बु.जिल्हा परिषद शाळेत भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## प्रभात फेरी मधील महापुरुषाचा वेशभूषांनी वझूरकरांचे लक्ष वेधले



**मानवत । प्रतिनिधी**

मानवत तालुक्यातील मौ. वझुर बु, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २६ जानेवारी रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७५ वा वर्धापन दिन अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी सकाळी शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी महापुरुषांचा वेशभूषा साकारल्या होत्या त्यामुळे प्रभात फेरी अतिशय लक्षवेधी ठरली होती प्रभात फेरी दरम्यान विदयार्थ्यांनी रस्ता सुरक्षा बाबत घोषणा देत रस्त्यावरून चलताना नियमाचे पालन करावे तसेच (ग्रश्रज्ञ ेप ठळसहीं ) या बद्दल जन जागृती करण्यात आली प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण समारंभानंतर कुष्ठरोग प्रतिज्ञा मा. जिल्हाधिकारी यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले शाळेतील विद्यार्थी विविध महापुरुषांच्या वेशभूषेत अगदी सजून आले होते त्यामुळे लक्षवेधी दिसत होते यावेळी प्रजासत्ताक दिनानिमित्त अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमास समारंभास गावातील प्रमुख पदाधिकारी, ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक श्री. विजय वाघ यांनी केले तर आभार श्री. नागनाथ बोधने यांनी मानले शाळेचे मुख्याध्यापक श्री. झेलाजी काळे व शिक्षक श्री. अल्ताफ शेख यांनी कार्यक्रम यशश्वि रित्या पार पाडण्या साठी अचूक नियोजन केले त्यांना शालेय व्यवस्थापन समितीने सहकार्य केले.

# चंद्रकांत उर्फ तात्यासाहेब उदगुडे पाटील यांना अमेरिका युनिव्हर्सिटी डॉक्टर ही पदवी प्रदान




**पाटोदा/प्रतिनिधी**

भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रकांत उर्फ तात्यासाहेब उदगुडे पाटील यांना भारत निर्माण योगदान अवॉर्ड-२०२४ त्याच प्रमाणे अमेरिका युनिव्हर्सिटी डॉक्टर ही पदवी मुंबई अंधेरी कोहिनूर हॉटेल्स या ठिकाणी दिनांक २४/०१/२०२४ बुधवार रोजी प्रदान करण्यात आला. भ्रष्टाचार निर्मूलन समिती ची स्थापना-२०१० साली झाली, आज सुमारे १४ ते १५ वर्ष समिती च्या माध्यमातून शहर तिथे समिती, गाव तिथे समिती, हा ध्यास मनात धरून गावोगावी समितीची स्थापना करून भ्रष्टाचाराच्या विरुद्ध पदाधिकाऱ्यांच्या सोबतीने या माध्यमातून हा लढा सुरू ठेवला आहे. हा लढा लढत असताना महाराष्ट्रातील सरकारी सिस्टीम मधल्या भ्रष्टाचाराला नष्ट करायचं काम त्याच प्रमाणे पाटील यांनी समाजिक बांधिलकी जपत समाजसेवा जोपासली आहे. भ्रष्टाचार निर्मूलन समिती मध्ये काम करणाऱ्या सर्व पदाधिकाऱ्यांना फार अभिमान वाटत असल्याचे महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांची प्रतिक्रिया येत आहे. या प्रसंगी घरकुल चे समाजसेवक सर्वांचे लाडके इंडियन आर्मी कमांडो श्री.सावंत काका यांना ही भारत निर्माण योगदान अवॉर्ड-२०२४ देऊन त्यांचा ही सन्मान त्या ठिकाणी करण्यात आला. या प्रसंगी भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष शांताराम खुडे आणि महाराष्ट्रातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात असून पुढील कार्यास शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे.

# जिंतूर तहसीलदारांच्या वाहनाला अचानक आग-तहसील कार्यालयातील घटना



**जिंतूर । प्रतिनिधी**

परभणी येथील पोलीस पाटील परीक्षेचे काम आटोपून तहसीलदार राजेश सरवदे हे कर्मचाऱ्या सोबत परत जिंतूर तहसील कार्यालयात आले असता उभ्या असलेल्या सरकारी वाहनाला अचानक आग लागून मोठे नुकसान झाले असल्याची घटना रविवार २८ जानेवारी रोजी सायंकाळी ७:३० वाजण्याच्या सूमारास घडली.तहसीलदार यांच्या वाहनाला आग लागल्याचे वृत्त समजताच तलाठी मोहसीन पठाण,रवी कारंजकर चालक इफ्फत पठाण यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला.

या बाबत अधिक माहिती अशी की,परभणी येथे पोलीस पाटील भरतीची परीक्षा असल्याने व त्यात तहसीलदार राजेश सरवदे यांची भरारी पथकात नियुक्ती झाल्याने ते सरकारी वाहन क्रमांक एम एच २२ डी १०११चे चालक इफ्फत पठाण,तलाठी अनिल राठोड,शिपाई नय्युम अतार यांच्या सह परभणी येथे सकाळी अकरा वाजता गेले होते तिथं कर्तव्य बजावून ते सायंकाळी सहाच्या सुमारास जिंतूरला परत आले सदरील वाहन तहसील कार्यालयाच्या आवारात लावून चालक व सर्व अधिकारी घरी गेले असता सात वाजण्याच्या सुमारास अचानक वाहनाने पेट घेतला ही घटना शिपाई माधव खरात यांनी पाहताच त्यांनी वरिष्ठांना या बाबत माहिती दिली तलाठी मोहसीन पठाण,, रवी कारंजकर,चालक इफ्फत पठाण यांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला आग वाढत जाऊन तहसील कार्यलयाच्या भिंतीला लावलेल्या बॅनर ने पेट घेतला पंधरा मिनिटांनी अग्निशामक दलाच्या जवानांनी येऊन आग विझवली त्यामुळे पुढील अनर्थ टळला.वाहनाला नेमकी आग कशामुळे लागली हे मात्र समजू शकले नाही.

**वाहनांचे आयुष्य संपले होते– इफ्फत पठाण**

सदरील वाहन निर्लेखीत होऊन एक वर्ष पूर्ण झाले होते परंतु नवीन वाहन उपलब्ध झाले नसल्याने निर्लेखीत झालेल्या वाहनाला डागडुजी करून आम्ही वापरत होतो अशी माहिती वाहनाचे चालक इफ्फत पठाण यांनी दिली.

# मुंबईवरून परतणाऱ्या मराठे मावळ्यांचा जंगी स्वागत



**कौसडी । प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील बोरी येथून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांना समर्थन देण्यासाठी २३ मावळे दिनांक २० जानेवारी रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर रवाना झाले होते.महाराष्ट्र शासनाने मनोज जरांगे पाटील व महाराष्ट्रातील सकल मराठा समाज बांधवांच्या आरक्षणाबाबतच्या सर्वच मागण्या मान्य केल्याने महाराष्ट्रभरात मराठा बांधवांनी दिवाळी साजरी केली. शहरांसह खेड्या गावांमध्ये पेढे वाटून फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष साजरा केला.बोरी येथून मुंबईला गेलले २३ मराठे मावळे दिनांक २८ जानेवारी रविवार रोजी सायंकाळी पाच वाजता बोरी येथे परतल्याने गावकऱ्यांच्या वतीने कौसडी फाटा येथे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी पाच जेसीबीच्या साह्याने फुलांची व गुलालाची उधळण करण्यात आली. तसेच या मराठे मावळ्यांना भगवे फेटे बांधून पुष्पहार घालून सत्कार करण्यात आले.ढोल ताशांच्या गजरात कौसडी फाटा येथून गावभरातून मिरवणूक काढण्यात आली होती.यावेळी महिलांसह मराठा बांधव तसेच मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रसिद्ध साहित्यिक,पत्रकार राजेश बारसागडे यांचा नाभिक समाजातर्फे सत्कार



**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

ब्रम्हपुरी येथील नाभिक युवा बहुउद्देशीय संस्थे तर्फे २६ ते २७ जानेवारी रोजी आयोजित शनिवारी पार पडलेल्या श्री संत शिरोमणी नगाजी महाराज यांच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा व अनावरण लोकार्पण सोहळ्यात नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील महाराष्ट्र शासन 'बालकवी' पुरस्कार प्राप्त कवी,उत्कृष्ट पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते राजेश देवराव बारसागडे यांचा सन्मान चिन्ह,प्रशस्तीपत्र, ग्रामगिता व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

श्री संत श्रीरोमणी नगाजी महाराज प्राण प्रतिष्ठा,लोकार्पण व अनावरण या कार्यक्रमाचे उदघाटन महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेता तथा आमदार विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते करण्यात आले.अध्यक्षस्थानी डॉ.संदीप लांजेवार होते.विशेष अतिथी म्हणून माजी आमदार.डॉ.नामदेव उसेंडी होते.तर प्रमुख अतिथी म्हणून नाभिक समाजाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष रविंद्र येसेकर,विजय वडेकर,डॉ.नामदेव शिंदे,हसन अली गिलानी, ड.हेमंत उरकुडे,ॲडो.किशोर चोपकार, प्रशांत जम्पलवार,कल्पना सूर्यवंशी,श्रद्धा सूर्यवंशी,अमित कन्नाके,ईश्वर मेंढुळकर आदींची उपस्थिती होती.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'शिवरक्षक जिवाजी महाला'कार, हरीश ससनकर,महाराष्ट्र शासन 'बालकवी' पुरस्कृत कवी राजेश बारसागडे होते.दरम्यान विविध तालुकां व जिल्हयांतील नाभिक समाज संघटना व समाज बांधवांची उपस्थिती लाभलेल्या या भव्य दिव्य सोहळ्यात प्रसिद्ध लेखक हरीश ससनकर यांच्या हस्ते राजेश बारसागडे यांचा सन्मान चिन्ह,प्रशस्तीपत्र, ग्रामगिता व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमात समाज बांधवांना उदबोधन करताना राजेश बारसागडे म्हणाले की,नाभिक समाज हा लढव्यय असा समाज आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या साम्राज्यात शिव रक्षक जिवाजी महाले व शूरवीर शिवाजी काशीद हे दोन मावळे नाभिक समाजाचे होते.त्यांनी आपल्या राजाचे प्राण वाचविण्यासाठी स्वत:च्या जीवाची आहुती दिली.म्हणूनच होता जिवा म्हणून वाचला शिवा हे म्हण समाजमनात सर्वांच्या मुखात दृढ झाले.मात्र या समाजाची शैक्षणिक, सामाजिक,राजकीय,आर्थिक प्रगती झाली नसल्यानेच नाभिक समाज दारिद्राच्या चक्रव्यूहात अडकून बसला आहे.यासाठीच आता एकसंघ होऊन सामूहिक लढा देने आवश्यक झाले आहे.असे मार्मिक मार्गदर्शन केले.संचालन प्रणय देवगडे व लक्ष्मण मेश्राम यांनी केले.

**प्रकाशित व अप्रकाशित साहित्य...**

प्रसिद्ध साहित्यिक तथा पत्रकार राजेश बारसागडे यांचे 'चार तरंग अस्वस्थतेचे' (प्रातिनिधिक चारोळी संग्रह),कोंबडा झाला घड्याळ(बालकविता संग्रह),तू कधीच समजून घेतलं नाही (ललित संग्रह),हे ग्रंथ प्रकाशित असून 'अंतरली प्रीत अशी'(कविता संग्रह), काळीजकळा(चारोळी संग्रह),व अन्य एक बालकविता संग्रह अप्रकाशित आहेत.त्यांच्या 'कोंबडा झाला घड्याळ' या बालकविता संग्रहास सन -२०१२ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य निर्मिती साठी दिला जाणारा 'बालकवी' पुरस्कार व दर्यापूर येथून डॉ.पंजाबराव देशमुख वांङ्मय पुरस्कार मिळाला आहे.त्यांचे साहित्यिक, पत्रकारिता,सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान आहेत.यासाठीच त्यांचा नाभिक युवा बहुउद्देशीय संस्थेने सन्मान केला.

# सर्वांगिण विकासातून मुल तालुका महाराष्ट्रात अव्वल करणार–ना.मुनगंटीवार

**मूल । प्रतिनिधी**

मूल तालुक्यात विविध लोकोपयोगी विकासकामे हाती घेण्यात आली आहे.मुख्य रस्ता, पाणीपुरवठा योजना,स्टेडियम,डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, तसेच शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, कृषी महाविद्यालय, महिलांच्या पंखांना बळ देणारे सर्वोत्कृष्ट शुरवी महाविद्यालय यासारखे मोठे प्रकल्प उभे राहत आहे. मुल तालुक्याचा चेहरा– मोहरा बदलविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची आवश्यकता असून सर्वांगिण विकासातूनच हा तालुका महाराष्ट्रात अव्वल करण्याच्या दृष्टीने कार्य करण्यात येत असल्याचे राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले.

मुल नगरपरिषद क्षेत्रातील विविध विकासकामांच्या लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा संध्या गुरनुले, मूलचे उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, तहसीलदार रवींद्र होळी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यशवंत पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रशांत वसुले,प्रभाकर भोयर,रत्नमाला भोयर, चंदू मारगोनवार,नंदू रणदिवे आदी उपस्थित होते. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी हजारो शहिदांनी प्राणाची आहुती दिली,असे सांगून ना.सुधीर मुनगंटीवार म्हणाले,देशाला संविधान अर्पण होऊन ७४ वर्षे पूर्ण झालीत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दायित्व,कर्तव्य व जबाबदाऱ्या संविधानामध्ये लिखित स्वरूपात दिल्या.त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे हे ३५० वे वर्ष असून मुलचा गौरव वाढवीत छत्रपती शिवाजी महाराज व्यापार संकुलाची निर्मिती करण्यात आली.




सर्वप्रथम जेव्हा स्व.दिलीप पारधी यांच्यासमवेत मुल येथे आठवडी बाजार बघण्यासाठी आलो.तेव्हा चिखल,कच्चा रस्ता व घाणीचे साम्राज्य होते.आता या ठिकाणी सुसज्ज अशा आठवडी बाजाराची निर्मिती करण्यात आली.महात्मा ज्योतिबा फुले या नावाने हे आठवडी बाजार सेवेसाठी लोकार्पित करीत आहे. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांचा आसूड हे पुस्तक लिहून शेतकऱ्यांसाठी असलेला भाव व्यक्त केला.हा बाजार येथील शेतकरी बांधवासाठी निश्चितच सेवा देईल,असा विश्वास ना . मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

महर्षी वाल्मिकीच्या नावाने मुख्य रस्त्यावर प्रवेशद्वार उभारण्यात आले. प्रवेशद्वाराची निर्मिती व्हावी,यासाठी भोई समाजाच्या नागरिकांची मागणी होती. सदर प्रवेशद्वारासाठी ५० लक्ष रुपये मंजूर केले. मात्र, जागेअभावी २५ लक्ष रुपये खर्च करून गेटची निर्मिती झाली. या प्रवेशद्वारातून जातांना महर्षी वाल्मिकीचे स्मरण निश्चितच होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तसेच शिल्लक २५ लक्ष रुपयात श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने दुसरे अटल गेट उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पुढे बोलतांना ना .मुनगंटीवार म्हणाले, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर शहीद स्मारकाची (म्युरल) निर्मिती करण्यात आली. या स्मारकामध्ये शहीद भगतसिंगाची प्रतिकृती आहे.स्वातंत्र्यासाठी मेरा रंग दे बसंती चोला म्हणत भगतसिंग हसत–हसत फासावर गेले. ते स्मारक येथील तरुण–तरुणींच्या आयुष्याचे उद्दिष्ट ठरवेल. या तरुणांमध्येही देशासाठी काही करावयाचे आहे, हा भाव निर्माण होईल.

मूल येथे मुख्य रस्ता, कर्मवीर मा.सा. कन्नमवार सभागृह, तहसील कार्यालय, पंचायत समितीची इमारत, पाणीपुरवठा योजना, स्टेडियम, डॉ श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, इको पार्क, स्विमिंग टँक, आठवडी बाजार असे विविध विकासकामे तालुक्यात झाली. १०० खाटांच्या मुल उपजिल्हा रुग्णालयाला मान्यता मिळाली. सोमनाथ येथे भव्य कृषी महाविद्यालय उभे राहत आहे. तसेच मुलींसाठी शुरवी महाविद्यालय सुरू करण्यात आले आहे. येणाऱ्या ५ वर्षात जिल्ह्यातील महिलांच्या पंखांना बळ देणारे शुरवी महाविद्यालय सर्वोत्कृष्ट होईल. जगातल्या उत्तम विद्यापीठाशी हे महाविद्यालय जोडण्यात येईल. या माध्यमातून मुलची विद्यार्थिनी प्रशासकीय अधिकारी होऊन मुलचा गौरव वाढवेल.

चंद्रपुरातील मोरवा येथे फ्लाईंग क्लब सुरू करण्यात येत असून एअरपोर्ट विकसित करण्यात येत आहे. गरीब कुटुंबातील मुलगीही वैमानिक व्हावी आणि ती चंद्रपूर जिल्ह्यातील असावी,असा निश्चय केला आहे.चंद्रपूर विकासाच्या बाबतीत इतर जिल्ह्याच्या तुलनेत पुढे आहे. मात्र, मागील दोन वर्षात जिल्हा विकासाच्या बाबतीत मागे राहिला. त्यामुळे जे मागे राहिले ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले. मुल येथे २८ तलाठी कार्यालय होत आहे. ६०० कोटी रुपयांच्या एस.एन.डी.टी विद्यापीठाला मान्यता आणली व ६२ कौशल्याधारीत प्रशिक्षण महिलांना देण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाठी निधी मंजूर केला आहे. मुल पोलीस स्टेशनचे डिझाईन तयार करण्यात येत असून पोलिसांचे निवासस्थान देखील उत्तम करण्यात येईल. तसेच मुल तालुक्यातील नागरिकांचे पट्टे व घरकुलांचा प्रश्न देखील निकाली काढण्यात येईल. मुल तालुका महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट असला पाहिजे, हा संकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्य करण्यात येत असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

## समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सोबत येऊ–आ.प्रतिभा धानोरकर

**वरोरा । प्रतिनिधी**

आज समाजाच्या सर्वांगीण विकासाकरीता समाजातील सर्व नागरीकांना सोबत येणे गरजेचे असल्याचे मत आ. प्रतिभा धानोरकर यांनी धनोजे कुणबी समाजाद्वारा आयोजित राज्यस्तरीय वधु–वर परिचय मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

वरोरा तालुका धनोजे कुणबी समाज द्वारा दि. २७ जानेवारी २०२४ रोजी धनोजे कुणबी सभागृह वरोरा येथे राज्यस्तरीय वधु–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केले. यावेळी आ. प्रतिभा धानोरकर यांनी मत व्यक्त करतांना सांगितले की आजच्या युगात प्रत्येक समाजाने आपला विकास साधने गरजेचे आहे. हा विकास साधण्यासाठी आपण देखील एकत्रीत येणे गरजेचे आहे. भविष्यात समाजाच्या विकासासाठी मी कटिबध्द असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या वधु–वर परिचय मेळाव्यातून भविष्यातील योग्य जोडीदार निवडून सुखी संसाराचे स्वप्न पुर्ण करावे, असे मत देखील यावेळी व्यक्त केले. अलीकडच्या धावपळीच्या युगात मुला–मुलींचा शोध कठीण असून या मेळाव्याच्या निमित्ताने समाजाने एक संधी निर्माण केली असल्याचे आ. प्रतिभा धानोरकर यांनी सांगितले.



यावेळी मंचावर विधान परिषदेचे आमदार सुधाकरराव अडबाले, माजी आमदार वामनराव चटप, माजी आमदार सुदर्शन निमकर, माजी आमदार संजय धोटे त्यासोबतच अन्य मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी इतर मान्यवरांनी देखील आपले मत व्यक्त करत समाजाप्रती आपण देणं लागत असल्याची भावना व्यक्त केली. सदर कार्यक्रमाच्या यषस्वीतेसाठी धनोजे कुणबी समाजातील अनेक पदाधिकारी तसेच सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

## राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचीसिरोंचा येथील वल्ली हैदर शाह उर्स उत्सवाला भेट

**सिरोंचा । प्रतिनिधी**

राज्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या सिरोंचा येथे दरवर्षी होत असलेल्या हजरत वली हैदर शाह उर्स व कव्वाली कार्यक्रमाला माजी राज्यमंत्री तथा पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी भेट देऊन चादर चढवत दर्शन घेतले.

सिरोंचा तालुक्यात दरवर्षी उर्स महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.येथे होणाऱ्या उर्स जत्रेला अनेक वर्षांची परंपरा आहे. हिंदू–मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणूनही या उर्स कडे पाहिले जाते.यानिमित्ताने होणाऱ्या उर्स संदल, कुराण पठण, ध्वज चढविणे आदी कार्यक्रम व कव्वाली पाहण्यासाठी गडचिरोली जिल्ह्यासह लगतच्या तेलंगाणा व छत्तीसगड राज्यातील सर्वधर्मीय भाविक मोठ्या संख्येने येतात.उर्स महोत्सवा निमित्ताने सुरू असलेल्या कव्वाली कार्यक्रमाचे उद्घाटन यावेळी माजी राज्यमंत्री तथा



पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले.२८ जानेवारी रोजी पहिल्याच दिवशी माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी भेट घेऊन चादर चढवत समस्त जनतेला सुख–शांती,समाधान व उत्तम आरोग्य लाभावे असे वल्ली हैदर शाह बाबाकडे प्रार्थना केली.दरम्यान मस्जिद दरगाह कब्रस्थान ईदगाह ट्रस्ट कमिटी तर्फे माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचे भले मोठे हार व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी या कार्यक्रमाला मस्जिद दरगहा कब्रस्तान ईदगाह ट्रस्ट कमिटीचे पदाधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचे कडून आजाराने ग्रस्त असलेल्या महिलेला आर्थिक मदत

**अहेरी । प्रतिनिधी**

तालुक्यातील मरनेली(राजाराम) येथील मंजू ईश्वर तलांडे वय ३५ वर्षे ही महिला खूप दिवसापासून अपेनडिक्स, किडणी स्टोन या आजाराने ग्रस्त होती.तलांडे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकिचे असल्याने चांगल्या खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आर्थिक अडचण भासत असल्यामुळे संपूर्ण तलांडे कुटुंब चिंतेत होते.परंतु याची माहिती माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांना कळताच त्यांनी आपल्या स्थानिक कार्यकर्ते यांच्या माध्यमातून मंजू ईश्वर तलांडे या महिलेला आर्थिक मदत केली.



अहेरी इस्टेट चे राजे,माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम हे आपल्या अहेरी विधानसभा क्षेत्रातील अपघात ग्रस्त,कॅन्सर ग्रस्त आणि आर्थिक अडचणीत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मदत करत असतात.त्यांनी आतापर्यंत अनेक गरजुवंताला आर्थिक मदत केली आहे.

## नांदेड येथील यंदाच्या जागतिक धम्म परिषदेच्या विशेष उपस्थितीचा मान उत्तर महाराष्ट्राच्या सुपुत्राला

**नांदेड । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी १० व ११ फेब्रुवारी २०२४ रोजी किनवट (जि. नांदेड) येथे जागतिक बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. यंदाच्या बौद्ध धम्म परिषदेत उत्तर महाराष्ट्रातील डॉ.निलेश राणे यांची विशेष उपस्थिती लक्षवेधक असणार आहे. राष्ट्रीय गुन्हे नियंत्रण संघटनेच्या (दिल्ली) राज्यमंत्रीपदी डॉ.निलेश राणे यांची नुकतीच नियुक्ती झालेली आहे. तसेच ते भारतीय क्रीडा विकास आणि पदोन्नती महासंघ (दिल्ली)चे राष्ट्रीय उपाध्यक्ष देखील आहेत.निलेश राणे युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत सेवा देण्याची धडपड डॉ.राणे करीत आहेत. त्यांच्या क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातील कामाची दखल जगभरात घेतली जात आहे.जेएनयू विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष कन्हैया कुमार यांची देखील डॉ.राणे यांच्यासोबत विशेष उपस्थिती असणार आहे.किनवटचे माजी नगराध्यक्ष अरुण आळणे हे जागतिक बौद्ध धम्म परिषदेचे निमंत्रक तर आयोजक राहुल कापसे आहेत.



## जि.प.प्राथमिक शाळा काळेवाडी येथे स्नेहसंमेलन धुमधडाक्यात

### स्नेहसंमेलनात ८० हजार रुपये जमा




**दौंड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेवाडी ता. दौंड,पुणे या शाळेमध्ये ७५ वा प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने प्रथम सत्रामध्ये सकाळी ठिक ७ : वाजता ग्रामजागृती फेरीचे, ढोलताशांच्या गजरात व घोषणांच्या निनादात आयोजन केले. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, श्रीराम, लक्ष्मण, जानकी, हनुमानजी, वासुदेव, विठ्ठल–रुक्मिणी यांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी फेरीच्या पुढे होते. फेरीमध्ये बहुसंख्येने पालक, मातापालक, आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

फेरीनंतर ठिक ८ वाजता सर्व पालक महिलांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सौ. रोहिणी अजिनाथ काळे व प्रमुखपाहुण्या काळेवाडीच्या पोलीसपाटील सौ. राधिका पहाणे या होत्या. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.ध्वजारोहनानंतर मुख्याध्यापकांनी प्रस्ताविकातून शाळेमध्ये वर्षभर चालणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच वेगवेगळ्या शासकीय योजना, स्पर्धा परीक्षा यांची माहिती सांगितली व मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काळेवाडीचे माजी विद्यार्थी ह.भ.प. काका महाराज पहाणे यांचेकडून २५ हजार रुपये देणगी देण्यात आली.यानंतर सकाळी ठिक ९.०० वाजता ह.भ.प. काका महाराज पहाणे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. काका महाराजांच्या मधुर, रसाळ आणि हितकर वाणीतून त्यांनी संविधानाचे महत्त्व, राष्ट्रगीत– प्रतिज्ञांचा गर्भार्थ, शिक्षणासाठी पालक व शाळा समन्वय विद्यार्थ्यांवरील संस्कार, संस्कृतीचे जतन या विषयांवर प्रकाश टाकला. सव्वातासाच्या व्याख्यानाने ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले होते. शाळा व्यवस्थापनचे अध्यक्ष सुदामराव भोसले यांचे हस्ते ह.भ.प. काका महाराज पहाणे यांचा सत्कार करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीने त्यांचे हार्दिक आभार मानले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून प्रथम सत्राची सांगता झाली.दुसऱ्या सत्रात संध्याकाळी ठिक ७.०० वाजता स्नेहसंमेलन सुरू झाले. सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने व गणेश वंदनाने कार्यक्रम सुरु झाला. महाराष्ट्राची परंपरा, संस्कृती व विविधता दर्शवणाऱ्या गीतांवरील नृत्यांचा समावेश कार्यक्रमात होता. लोकगीत, कोळीगीत, आदिवासी गीत, वासुदेव गीत अशा धार्मिक गीतांचा समावेश असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. ३७ विद्यार्थी २० गीतांवरील नृत्यात सहभागी झाले. ग्रामस्थांनी बक्षिसांचा अगदी पाऊस पाडला. त्यामुळे सर्व कार्यक्रमासाठी एकूण लोकवर्गणी ८० हजार रुपये एवढी जमा झाली.धावत्या भेटी दरम्यान विरधवल (बाबा) जगदाळे यांनी शाळा इमारत व इतर भौतिक सुविधा मिळवून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. शाळा व्यवस्थापनच्या अध्यक्षांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे उत्तम नियोजन व ग्रामस्थांची उपस्थिती याबद्दल पाटील यांनी कौतुक केले. रात्री १०.०० वाजता कार्यक्रम संपला.त्यानंतर स्नेहभोजनाची व्यवस्था डॉ. निखिल नामगुडे, हनुमंत (तात्या)बरडे, बापूराव गायकवाड, अविनाश गायकवाड व अशोक चव्हाण यांनी केली होती. शांततेच्या सहकार्याबद्दल मुख्याध्यापकांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .